। बहूजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD. No.
L2/RNP/PPR/04/2021-2023

FACEBOOK/
MANDESHVARTA

सांगोला * जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २५ वे * रविवार दि. ०६ एप्रिल २०२५ * पाने ४ * मूल्य १ रू * अंक १५ वा

## ज्ञान, विज्ञान आणि संस्कार यांचा त्रिवेणी संगम म्हणजे उत्कर्ष विद्यालय-प्रा.विजय पवार



सांगोला(प्रतिनिधी):-माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान संचलित उत्कर्ष विद्यालय सांगोला येथे शैक्षणिक वर्ष २०२४- २५ चा 'वार्षिक क्रीडा स्पर्धा बक्षीस वितरण समारंभ' संपन्न झाला. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा घेण्यात आलेल्या बुद्धिबळ, बॉक्सिंग, कराटे, जिम्नॅस्टिक तसेच क्रिकेट या स्पर्धांमध्ये तसेच शालेय मैदानी स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. कार्यक्रम प्रसंगी बोलताना ज्ञान, विज्ञान आणि संस्कार यांचा त्रिवेणी संगम म्हणजे उत्कर्ष विद्यालय, असे गौरवोद्गार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे क्रीडा शिक्षक प्रा. विजय पवार सर यांनी आपल्या मनोगता दरम्यान काढले. विद्यालयाच्या क्रीडा स्पर्धेतील उज्वल यशाचा गौरव करताना मा. चडचणकर सर म्हणाले, मनगटात रग आणि छातीत धग असेलतरच इतिहास घडतो. आपल्या अध्यक्षीय मनोगतात संस्था अध्यक्षा मा. नीलमताई कुलकर्णी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना विद्यार्थ्यांना हिऱ्याचे उपमा देत विद्यालयाच्या गौरव कायम राखण्याच्या आवाहन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी, त्यांचे पालक तसेच मार्गदर्शक क्रीडा शिक्षक सचिन गोतसूर्य सर यांचे प्रमुख पाहुणे प्रा.विजय पवार, क्रीडा शिक्षक विजयकुमार चडचणकर सर, संस्थाध्यक्षा नीलिमाताई कुलकर्णी, डॉ. संजीवनीताई कुलकर्णी, संस्था सचिव वसुंधराताई कुलकर्णी, संस्था कोषाध्यक्षा डॉ. एलिनीताई कुलकर्णी, माध्यमिक चे मुख्याध्यापक सुनील कुलकर्णी सर, प्राथमिक मुख्याध्यापिका मागाडे बाई, पर्यवेक्षक भोसले सर व मिसाळ सर यांनी अभिनंदन केले.

## राज्यस्तरीय संस्कृत परीक्षेतील विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ संपन्न

सांगोला (प्रतिनिधी):- महाराष्ट्र शासन संस्थापित कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक, नागपूर.विस्तार सेवा मंडळाद्वारे रवीकीर्ती संस्कृत अध्यापन केंद्र, सांगली यांच्या वतीने माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्यासाठी संस्कृत चित्रपदकोष ही जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित केलेली होती. या स्पर्धेमध्ये माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, संचलित उत्कर्ष विद्यालय सांगोला .येथील इयत्ता सातवीतील एकुण ५५ विद्यार्थी परीक्षेसाठी बसलेले होते. त्यातील ५ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे .त्या पात्र विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ विद्यालयाचे प्राचार्य श्री.कुलकर्णी सर पर्यवेक्षक -भोसले सर, मिसाळ सर यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये शिवतेज महेश बुरंजे, स्नेहलदविलास जानकर, श्वेताली युवराज सावंत या विद्यार्थ्यांनी शंभर पैकी १०० मार्क प्राप्त केलेले आहेत. तर चि. सार्थक सुशांत वसमाळे याने ९८ मार्क मिळवून द्वितीय क्रमांक पटकावलेला आहे. शुभदा श्रीपाद वांगीकर या विद्यार्थिनीने ९२ गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकावलेला आहे. या सर्व विद्यार्थ्यांना संस्कृत विभाग प्रमुख-सौ.रेखा भिंगार्डे मॅडम व शुभांगी कवठेकर मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

## व्हिडियो निर्मीती स्पर्धेत शोभा पाटील- धोत्रे याना पारितोषिक



सांगोला(प्रतिनिधी):- जि. प.प्रा.शाळा महुद बु.ता. सांगोला येथील शिक्षिका शोभा पाटील - धोत्रे यांना राज्यस्तरीय वीडियो निर्मीती स्पर्धेत पारितोषिक प्राप्त झाले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वेळापूर जि. सोलापूर व शालेय शिक्षण विभाग जि. सोलापूर यांच्या मार्फत ही स्पर्धा झाली होती.स्पर्धेचा जिल्हा स्तरित पारितोषिक वितरण सोहळा सोलापुर येथील शिवछत्रपती रंगभवन येथे संपन्न झाला.या स्पर्धेत सांगोला तालुक्यात इयत्ता सहावी ते आठवी सा.विज्ञान या गटात तालुक्या द्वितीय आल्या बद्दल त्यांना हा पुरस्कार जिल्हा परिषद सोलापुरचे शिक्षण अधिकारी कादर शेख, डायटचे प्राचार्य जितेंद्र साळुंखे, अधिव्याख्याता तुकाराम राजे व शशिकांत शिंदे गटशिक्षणाधिकारी बापूसाहेब जमादार माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

## सांगोला येथे महाआरोग्य तपासणी उपचार शिबीर संपन्न



सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला शहरात रमजान ईदच्या शुभ मुहूर्तावर विविध सामाजिक संघटने मार्फत महा आरोग्य तपासणी व उपचार शिबिर संपन्न झाले. शिबीराचे उद्घाटन आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या व इतर मान्यवरांचे हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सिनर्जी मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल,मिरजचे प्रमुख डॉ.रविंद्र अरळी यानी मार्गदर्शन केले. शासनाच्या सेवा व सामाजिक संस्थांच्या सहकार्यातून असे उपक्रम सांगोल्यात होत असल्याबद्दल त्यानी समाधान व्यक्त केले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे वर्ष २६-२७ चे प्रांतपाल रो. जयेशभाई पटेल, सह्याद्री शिक्षण समुहाचे प्रमुख डॉ.दिलीपकुमार इंगवले,सांगोला रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. इंजि.विकास देशपांडे यानी मनोगत व्यक्त केले. सांगोला सिव्हिल इंजि.संघटनेचे अध्यक्ष संतोष भोसले यानी प्रास्ताविक केले. आभार प्रदर्शन शिवप्रेमी मंडळ सद्स्य अरविंद केदार यानी केले.ॲड.गजानन भाकरे यानी सूत्रसंचालन केले. या शिबिरात हृदयरोग, अस्थीव्यंग, जूरल मेडीसिन, मूत्ररोग, नेत्रचिकित्सा व नाक,कान,घसा आदि विकारावर रुग्णाची तपासणी करुन पुढील उपचारा साठी मार्गदर्शन केले..या शिबिरात बहुसंख्य रुग्णाची मोफत तपासणी करुन औषधोपचार सांगितला तसेच योग्य औषधे देण्यात आली. सांगोला शहरातील सिव्हिल इंजिनियर्स असोसिएशन, रोटरी क्लब सांगोला,शिवप्रेमी मंडळ,आपुलकी प्रतिष्ठान,सांगोला मेडिकल असोसिअशन,केमिस्ट ॲड ड्रजिस्ट संघटना,सर्व पत्रकार संघटना,शहीद जवान संघटना आदि विविध सामाजिक व सेवाभावी संस्थाच्या योगदानातून हे मोफत मोफत महाआरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले.

## श्रीराम जन्मोत्सवानिमित्त श्रीराम मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात



सांगोला (प्रतिनिधी- श्रीराम जन्मोत्सवानिमित्त श्रीराम मंदिर सांगोला येथे चैत्रशुद्ध प्रतिपदा गुढीपाडवा ते रामनवमी अखेर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे मंगलध्वनी, पूजा, काकड आरती, सकाळी नाम साधना मंडळाचा सामुदायिक जप, अभिषेक, अध्यात्म रामायण, महिला मंडळाचे भजन, गायन आदी कार्यक्रम त्याचबरोबर दररोज दुपारी विविध महिला भजनी मंडळाची भजने आयोजित करण्यात आली आहेत.रामनवमी दिवशी रविवार दि. ६ रोजी सकाळी १० ते१२ या वेळेत ह. भ. छ. शुभांगी संतोष कवठेकर यांचेजन्मोत्सव कीर्तन होणार असून दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी व सायंकाळी ५ ते ८ दरम्यान श्रींच्या पालखीची भव्य शोभायात्रा होणार आहे. सोमवार दि. ७ रोजी दुपारी१२ ते २ महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे.या सर्व कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ॲड.सारंग विलास वांगीकर, नाम साधना मंडळ व श्रीराम महिला भजनी मंडळ यांनीकेले आहे.

# संपादकीय......

जुने वर्ष-४२ वे
अंक-१९ वा

## महसूल विभागाचा जनहितैषी क्रांतिकारी निर्णय

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात कार्यरत असलेल्या सत्ताधारी महायुती सरकार विविध जनहितैषी निर्णय घेत महाराष्ट्रातील जनतेला दिलासा देण्याचे काम करत आहे. राज्यातील नागरिकांसाठी महसूल विभागाने मालमत्तांच्या दस्त नोंदणीबाबत क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. राज्यात १ मेपासून 'फेसलेस नोंदणी', 'मुद्रांक नोंदणी' आणि 'एक राज्य, एक नोंदणी' प्रणाली सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून तशी घोषणाही केलेली आहे. आता कोल्हापूरमध्ये कोणी घर घेत असेल तरी नागपुरातूनही त्यांना मालमत्तेसंदर्भातील दस्त नोंदणी करणे या निर्णयामुळे शक्य होणार आहे. आधार कार्ड आणि उत्पन्नाच्या दाखल्यावरून तुमचा चेहरा नोंदणीसाठी वापरण्याची सुविधा मिळणार आहे. या निर्णयामुळे या प्रक्रियेत होणारा भ्रष्टाचार कमी होईल, नागरिकांचा वेळ वाचेल आणि डिजिटल प्रक्रियेमुळे महसूल व्यवहार अधिक पारदर्शक होतील.

'डिजिटल इंडिया' आणि 'डिजिटल महाराष्ट्र' हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा संकल्प आहे आणि आम्ही त्यावर काम करीत आहोत. नवीन महसूल प्रणालीमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयामुळे भविष्यात घर खरेदी-विक्री, जमीन व्यवहार आणि नोंदणी अधिक सुटसुटीत आणि सुलभ होणार आहे. घराच्या नोंदणीसाठी उपनिबंधक कार्यालयात घालावे लागणारे हेलपाटे, लागलेल्या रांगा, दलालांचे जाळे यामध्ये सर्वसामान्य माणूस पिचला जात आहे. या निर्णयामुळे या सर्व गोष्टींना आळा बसणार आहे. ही सगळी प्रक्रिया ऑनलाइन असणार आहे. महसूल खात्याने एक राज्य एक नोंदणी हे धोरण स्वीकारले आहे. यानुसार आता राज्यातील कुठूनही कुठलीही मुद्रांक नोंदणी करता येणार आहे. आधार कार्ड, इन्कमटॅक्स कार्डच्या आधारे ही नोंदणी फेसलेस राहणार आहे. राज्यात रेडी रेकनरचे दर लागू करण्यात आले आहेत. यामध्ये क्षेत्रनिहाय दर असणे गरजेचे आहे. झोपडपट्टी, चाळी, औद्योगिक, वाणिज्य, पुनर्विकास आदीबाबत वेगवगळे दर असावे. यासाठी विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित सर्वे करून क्षेत्रनिहाय दर तयार करण्यात येणार आहेत. मुंबई शहरामध्ये प्राधान्याने या सर्वेची सुरुवात करावी. सिटी सर्वे क्रमांकानुसार मुंबई शहरातील जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित सर्वे पूर्ण करावा. याबाबत कालबद्ध कार्यक्रम आखून कारवाई पूर्ण करावी. याबाबत मुंबई शहरातील लोकप्रतिनिधींच्या सूचना घेण्यात याव्यात. रेडीरेकनरच्या दरामध्ये दुरुस्ती करायची असल्यास वर्षातून दोन वेळा दुरुस्ती करण्याचे अधिकार शासनाकडे घेण्यात यावेत, याबाबत कारवाई करावी.मुंबई शहरातील क्षेत्रनिहाय रेडीरेकरनच्या दराबाबत धोरण ठरविण्यासाठी मुंबईतील सर्व आमदार, सर्व संबंधित शासकीय यंत्रणा प्रमुख यांच्या बैठकांचेही राज्य सरकार लवकरच आयोजन करणार आहे. या नव्या व्यवस्थेमुळे नागरिकांना राज्यातील कोणत्याही नोंदणी कार्यालयात दस्तनोंदणी करण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होणार असून अनावश्यक खर्चही टाळला जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली एकत्रित नोंदणी योजना संपूर्ण राज्यात अमलात आणली जात आहे. ही प्रणाली डिजिटल इंडिया मोहिमेला चालना देणारी आहे. नागरिकांना दस्त नोंदणीसाठी नोंदणी कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची गरज भासणार नाही. दस्तांची ऑनलाईन मूल्यांकन प्रणाली लागू केल्यामुळे महसुलात अपव्यय किंवा चुकीच्या नोंदींसाठी वाव राहणार नाही. या योजनेच्या अधिक सुरक्षित अंमलबजावणीसाठी दस्तावर अधिकाऱ्यांची डिजिटल स्वाक्षरी बंधनकारक असणार आहे. तसेच नागरिकांच्या ओळखीची पडताळणी आधारकार्ड आणि पॅन कार्डच्या मदतीने केली जाणार आहे. खरेदी-विक्री व्यवहाराची नोंदणी संबंधित जिल्ह्यातील विशिष्ट नोंदणी कार्यालयातच याआधी नागरिकांना करावी लागत असे. त्यामुळे नागरिकांना अनावश्यक वेळ खर्च करावा लागत होता. आता या नव्या योजनेमुळे कोणत्याही जिल्ह्यात दस्तनोंदणी करणे शक्य होणार आहे. त्यामुळे खरेदीदार आणि विक्री करणाऱ्यांचा वेळ आणि खर्चही वाचणार आहे. जमिनी आणि मालमत्तांच्या दस्तांची नोंदणी त्या त्या जिल्ह्याच्या सहनिबंधक कार्यालयातच जाऊन करावी लागते. एका व्यक्तीने जर इतर जिल्ह्यात मालमत्ता खरेदी केली, तर त्या व्यक्तीला त्या जिल्ह्यात जाऊनच दस्त नोंदणी करावी लागते. मात्र याला प्रक्रियेला खूप वेळ जातो आणि यामुळे मोठी गैरसोय होते.

सध्या या योजनेची अंमलबजावणी प्रायोगिक तत्त्वावर मुंबई शहर आणि उपनगरात सुरू करण्यात येत असून जर ही योजना यशस्वी झाली तर त्यानंतर राज्यात ती लागू करण्यात येईल. हा निर्णय महाराष्ट्रीय जनतेच्या भल्यासाठीच असून तो उपयुक्त ठरणारा आहे. व्यवहार शेतजमिनीचा असो अथवा सदनिका खरेदी विक्रीचा असो, त्या व्यवहारात पैशांची जमवाजमव करताना संबंधितांची दमछाक होते. या होणाऱ्या व्यववहारामध्ये काही रक्कम रोखीच्या स्वरूपात तर काही रक्कम धनादेशाच्या स्वरूपात द्यावी लागत असते. त्यामुळे ज्या शहरामध्ये हा खरेदी-विक्रीचा व्यवहार झाला असेल, त्या शहरामध्ये व्यवहारासंदर्भातील पैशाची ने-आण करावी लागते, प्रवासाची दगदग सहन करावी लागते. या सर्व गोष्टींना आता पूर्णपणे विराम लागणार आहे. प्रारंभी, या उपक्रमांतर्गत मुंबई शहर आणि उपनगरांतील ३२ उपनिबंधक कार्यालये परस्पर जोडली गेली आहेत. त्यामुळे खरेदीदारांना दस्तनोंदणीसाठी ठरावीक कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही. कोणत्याही संबंधित कार्यालयातून दस्तनोंदणी करणे शक्य होणार आहे. या उपक्रमातील तांत्रिक अडचणींचे निराकरण केल्यानंतर पुढील एका महिन्यात संपूर्ण राज्यात ही योजना लागू करण्याचे नियोजन आहे. मार्च महिन्यात दस्तनोंदणी मोठ्या प्रमाणावर केली जाते, कारण रेडीरेकनर दरात वाढ होण्याची शक्यता असते. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या शेवटच्या टप्प्यात राज्यभर हा उपक्रम लागू करण्याऐवजी, मुंबईतील प्रयोग यशस्वी झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाचे महाराष्ट्रीय जनतेकडून उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले असून यामुळे पैशांची व वेळेची बचत होईल. व्यवहारासाठी करावी लागणारी धावपळ, शारीरिक दगदग संपुष्टात येईल आणि आपल्या निवासी तसेच सोयीच्या परिसरातच नोंदणी व्यवहार पूर्ण करणे शक्य होणार आहे.

### व्यंगचित्रे




### सुविचार

**आत्मविश्वासाने अशक्य गोष्टी शक्य होऊ शकतात.**

### धर्म

## रामनवमीला काय करावे आणि काय करू नये, नियम जाणून घ्या

राम नवमीचा सण भगवान श्री राम यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो. हिंदू धर्मात या दिवसाचे खूप महत्त्व आहे. या दिवशी भगवान श्रीरामांची पूजा केल्याने सुख आणि समृद्धी वाढते. या दिवशी काही विशेष नियमांचे पालन केल्याने भगवान श्रीरामांचा आशीर्वाद मिळतो. या दिवशी काही कामे टाळली पाहिजेत. श्री राम नवमीच्या दिवशी कोणते नियम पाळले पाहिजेत ते जाणून घेऊया.

भगवान श्री रामाची पूजा करा: रामनवमीच्या दिवशी भगवान श्री रामाची पूजा करणे खूप शुभ मानले जाते. या दिवशी भगवान श्रीरामांच्या मूर्तीला किंवा चित्राला गंगाजलाने स्नान घाला आणि त्यांना फुले, फळे आणि मिठाई अर्पण करा.

रामचरितमानस पठण करा: रामनवमीच्या दिवशी रामचरितमानस पठण करणे खूप शुभ मानले जाते. रामचरितमानसमध्ये भगवान श्री राम यांच्या जीवनाची कहाणी आहे.

दान करा: रामनवमीच्या दिवशी दान करणे खूप शुभ मानले जाते. या दिवशी गरीब आणि गरजूंना अन्न, कपडे आणि पैसे दान करा.

उपवास: रामनवमीच्या दिवशी उपवास करणे खूप शुभ मानले जाते. तुम्ही तुमच्या क्षमतेनुसार या दिवशी उपवास करू शकता.

भगवान श्री रामाच्या मंत्रांचा जप करा: रामनवमीच्या दिवशी भगवान श्री रामाच्या मंत्रांचा जप करणे खूप शुभ मानले जाते. तुम्ही श्री राम जय राम जय जय राम हा मंत्र जप करू शकता.

हनुमानजींची पूजा करा: रामनवमीच्या दिवशी हनुमानजींची पूजा करणे देखील खूप शुभ मानले जाते. हनुमानजी हे भगवान श्रीरामांचे परम भक्त आहेत.

तुळशीच्या रोपाची पूजा करा: रामनवमीच्या दिवशी तुळशीच्या रोपाची पूजा करणे खूप शुभ मानले जाते. तुळशीचे झाड भगवान विष्णूंना खूप प्रिय आहे.

प्रभू श्रीराम यांच्या जन्माचे ५ खरे पुरावे

राम नवमीला काय करू नये

कोणाचाही अपमान करू नका: रामनवमीच्या दिवशी कोणाचाही अपमान करू नका. या दिवशी सर्वांशी प्रेमाने आणि आदराने वागवा.

खोटे बोलू नका: राम नवमीच्या दिवशी खोटे बोलू नका. या दिवशी नेहमी खरे बोला.

कोणाशीही भांडू नका: राम नवमीच्या दिवशी कोणाशीही भांडू नका. या दिवशी शांतता आणि सौहार्द राखा.

तामसिक अन्न खाऊ नका: रामनवमीच्या दिवशी तामसिक अन्न खाऊ नका. या दिवशी सात्विक अन्न खा.

मद्यपान आणि धूम्रपान टाळा: रामनवमीच्या दिवशी मद्यपान आणि धूम्रपान टाळा.

कोणत्याही प्राण्याला छळू नका: रामनवमीच्या दिवशी कोणत्याही प्राण्याला छळू नका. या दिवशी सर्व प्राण्यांवर दया करा.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# कोळा विद्यामंदिर हायस्कूलचे एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षेत दैदीप्यमान यश

कोळा (वार्ताहर):- कोळा विद्यामंदिर हायस्कूल व ज्युनियर कॉलेजमध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचेकडून डिसेंबर २०२४ मध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये कोळा विद्यामंदिर हायस्कूलचे ०९ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून यापैकी ०८ विद्यार्थ्यांना एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती तर ०१ विद्यार्थ्याला छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

या विद्यार्थ्यांना पुढील चार वर्षांमध्ये एकूण ४२२४००/ - रुपये एवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून मिळणार आहे. एन.एम.एम.एस. एिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांमध्ये कोरे पृथ्वीराज रामचंद्र (जनरल-१९), आलदर ज्ञानेश्वरी समाधान (जनरल-७२), लोहार नेहा प्रशांत (जनरल१९१), मदने श्रावणी ब्रह्मदेव (छढ३-७), मदने आदित्य शिवाजी (छढ३-११), व्हनमाने आरोही बंडोपंत (छढ३-१३ ), गोडसे शिवम शंकर (जइउ८२), मोरे विपुल सुदीप (ङ३५३), छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीमध्ये पाटील मितवश्वास या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. वरील सर्व विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख सुखदेव कोळेकर सर, बाह्य परीक्षा विभाग प्रमुख प्रसाद आदाटे सर, निलेश कांबळे सर, शुभांगी नागरसे मॅडम, विद्या जाधव मॅडम, गुरुदेव उजनीकर सर, या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत शाळेमार्फत गुलाब पुष्प, मानाचा फेटा व पेढा देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष थोर स्वातंत्र्य सेनानी, शिक्षण महर्षी कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक श्रीकांत लांडगे सर, पर्यवेक्षक चारुदत्त जगताप सर व सर्व पालकांच्या उपस्थितीत पालक बंडोपंत व्हनमाने यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थी मनोगतामध्ये पृथ्वीराज कोरे, ज्ञानेश्वरी आलदर यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे कष्ट आणि संस्थेने व शाळेने केलेले योग्य नियोजन यामुळेच आम्हाला हे यश प्राप्त झाले.व दिवसेंदिवस कोळा विद्यामंदिरची होत असलेली शैक्षणिक प्रगती याबद्दल समाधान व्यक्त केले.पालकांनी उत्स्फूर्तपणे मार्गदर्शक शिक्षक व प्रशासकीय स्टाफ यांचा गुलाब पुष्प व मानाचा तुरेबाज फेटा बांधून सत्कार केला. पालकांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांनी प्रामाणिक अभ्यास केला व शिक्षकांनी चांगले मार्गदर्शन केले व संस्थेने व शाळेने योग्य नियोजन करून अंमलबजावणी केली त्यामुळेच विद्यार्थ्यांनी हे घवघवीत यश संपादन केले असे सांगितले.

अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य श्रीकांत लांडगे यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्था अध्यक्ष प्रा.पी.सी झपके सर, संस्था सचिव म.शं.घोंगडे सर, खजिनदार शं.बा.सावंत सर, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, संस्था कार्यकारणी सदस्य विश्वेशजी झपके, प्राचार्य श्रीकांत लांडगे पर्यवेक्षक चारुदत्त जगताप, संस्था बाह्य परीक्षा विभाग प्रमुख नामदेव खंडागळे सर व प्रशाला बाह्य परीक्षा विभाग प्रमुख प्रसाद आदाटे सर यांच्यासह प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. सूत्रसंचालन निलेश कांबळे सर व मारुती सरगर सर यांनी केले. आभार शुभांगी नागरसे यांनी मानले.

## जवळा येथील कृष्णाई रुरल सोसायटीस वार्षिक नफा ३ लाख ५६ हजार रुपय



जवळा (प्रशांत चव्हाण):- जवळा येथील कृष्णाई रुरल नॉन ग्री को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी सन २०२४-२५ चा वार्षिक नफा ३ लाख ५६ हजार रुपये एवढा झाला आहे.या संस्थेला २५ वर्षे पूर्ण होत असल्यामुळे संस्थेचे चालू वर्ष २०२५-२६ हे रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त प्रत्येक सभासदांना ५ किलो साखर ३ कि. गरा, २ किलो हरभरा डाळ,१ मोती साबण व सुगंधी उटणे अशा पाच वस्तू दीपावली भेट म्हणून देण्याचे ठरले आहे. या संस्थेचे संस्थापक मा.आ.दीपक आबा साळुंखे-पाटील यांच्या सखोल मार्गदर्शनाखाली ही संस्था २५ वर्षे पूर्ण करीत आहे.संस्थास्थापनेपासून दीपक आबांचे विश्वासू चेअरमन श्री.विजय ताराळकर दैनिक माणदूत एक्सप्रेसशी बोलताना म्हणाले चालू वर्षीचा नफा समाधानकारक असून पुढील वर्षीचा नफा अंदाजे ५ लाखाच्या पुढे घेऊन जाण्याचा आम्ही सर्व संचालक व कर्मचारी आणि सभासद बंधू यांच्या प्रयत्नाने यश संपादन करू संस्थेची संपत्तीक स्थिती संस्थेचे भाग भांडवल ४० लाख रुपये इतके असून संस्थेकडे १९३ लाख ठेवी आहेत.संस्थेकडे येणे कर्ज २ कोटी इतके असून संस्थेने ९२% वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण केलं आहे. वसुली करता या संस्थेचे संस्थापक यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले. तसेच पुढील वर्षापासून सभासदांना लाभांश देण्यात येईल. चेअरमन श्री.विजयकुमार ताराळकर आणि संस्थेचे व्हाईस चेअरमन श्री.गुणाप्पा शिवणगी यांनी सांगितले.

## सांगोला विद्यामंदिरमध्ये रमजान ईद निमित्त शीरखुर्मा पार्टीचे आयोजन
## सांगोला विद्यामंदिर मुस्लिम शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून आयोजन

सांगोला(प्रतिनिधी):-सध्याच्या काळात समाजात ऐक्य,सहिष्णुता आणि बंधुत्व वृद्धिंगतहोणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हा विचार प्रमाण मानत सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज मधील मुस्लिम शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आपले सहकारी शिक्षक बंधू भगिनीसाठी प्रेम,आपुलकीची भावना ठेवत रमजान ईद सणानिमित्त 'शीरखुर्मा' पार्टीचे आयोजन केले.

शीरखुर्मा पार्टीसाठी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, कार्यकारिणी सदस्या शीलाकाकी झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद,उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहत पार्टीचा आस्वाद घेतला. . हा उपक्रम एकमेकांच्या आनंदात सहभागी होण्याचा आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करण्याचा संदेश देणारा आहे. म्हणून सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला व सांगोला विद्यामंदिरच्या वतीने संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे,

संस्था कार्यकारणी सदस्य शीलाकाकी झपके, प्राचार्य अमोल गायकवाड यांचे हस्ते व प्रशासकीय अधिकारी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीत उपमुख्याध्यापिका

शहिदा सय्यद, प्रा.इसाक मुल्ला, सहशिक्षक अशपाक काझी,अन्सार इनामदार,मुस्तफा नदाफ ,सहशिक्षिका मेहजबिन मुलाणी,परी मुलाणी, शिक्षकेतर कर्मचारी मोहसीन मुजावर या मुस्लिम शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

## अखेर राजेवाडीतून पाणी सुटले; आम.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या वारंवारच्या पाठपुराव्यास अखेर यश

सांगोला(प्रतिनिधी):-सांगोला तालुक्यातील भीषण पाणी टंचाई जाणवत असताना सांगोला तालुक्यासाठी राजेवाडी तलावातून पाणी सोडण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री नाम.राधाकृष्ण विखे पाटील व पालकमंत्री नाम.जयकुमार गोरे यांच्याकडे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी लावून धरली होती. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या वारंवार पाठपुराव्याची व सततच्या मागणीची दखल घेऊन अखेर आज राजेवाडी तलावामध्ये पाणी सोडण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. आमदार डॉ बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे पाणी मिळाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांच्यासह आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचे परिसरातील शेतकऱ्यांमधून आभार मानण्यात येत आहेत. म्हसवड (राजेवाडी) तलावामध्ये सध्या पाणी शिल्लक असताना उन्हाळा हंगामाचे आवर्तन व त्याचे प्रकटन केले नाही. सदर तलाव सध्या पूर्ण क्षमतेने भरला असल्यामुळे लोकांनी तलावाच्या पाण्याच्या भरवशावर जनावरांसाठी चारा पिके केले आहेत. तसेच शेतकऱ्यांनी स्वतःचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी उन्हाळा हंगामाची पिके घेतली आहेत. सदर उन्हाळा हंगामाचे आवर्तन न मिळाल्यास जनावराच्या व माणसांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.धरणाची क्षमता १६९२ एम.सी. एफटी आहे. सध्या धरणात ९०० एम.सी.एफ टी पाणीसाठा आहे. तरी पिण्याचा पाण्यासाठी व जनावराच्या चारासाठी उन्हाळा हंगामाच्या आवर्तन प्रकटन करून उन्हाळा हंगामासाठी राजेवाडी तलावातून पाणी सोडण्यात यावे अशी मागणी आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे-पाटील व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून निवेदनदेऊन वारंवार मागणी केली होती. राजेवाडी तलावाला हक्काचे पाणी मिळणार असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांमधून आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.आमदार डॉ. बचबासाहेब देशमुख यांच्या मागणीची दखल घेऊन राजेवाडी तलावातून पाणी सोडण्यात आले असून सांगोला तालुक्यातील खवासपूर, कटफळ (दुधाळवाडी), लक्ष्मीनगर, अचकदाणी व आटपाडी तालुक्यातील पुजारवाडी, दिघंची, उंबरगाव येथील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून लाभ क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यानी जास्तीत जास्त रीतसर पाणी मागणी अर्ज करावेत असे आवाहन आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी केले असल्याची माहिती प्रसिध्दी प्रमुख भाई चंद्रकांत सरतापे यांनी दिली.

## हलदहिवडी विद्यालयाचे एन एम एम एस परीक्षेत उत्तुंग यशस्वी भरारी

सांगोला (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्याकडून डिसेंबर २०२४ मध्ये घेतलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत हलदहिवडी विद्यालयातील १६ विद्यार्थी पात्र आहेत.

एन एम एम एस शिष्यवृत्ती पात्र इयत्ता ा8वी मधील झुरे शितल दत्तात्रय ,जगदाळे समृद्धी अनिल, रणदिवे स्नेहा संतोष, होवाळ संगीता बापू या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहेत. तसेच छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये इयत्ता आठवी मधील चव्हाण सर्वेश राजेंद्र, सूर्यवंशी विराज अनिल, चव्हाण प्रांजली प्रकाश, चव्हाण दुर्गा कालिदास या विद्यार्थ्यांना पुढील पाच शैक्षणिक वर्षांमध्ये शिष्यवृत्ती मिळणार आहे.

## चुकीची दुरुस्ती

**माणदेश वार्ता अंक दि.३१ मार्च २०२५ रोजी च्या अंकात पान नंबर १,२,३,४ वर तांत्रिक चुकीने मंगळवार दि.३१ मार्च २०२५ असे छापले गेले आहे,त्या ऐवजी सोमवार दि.३१ मार्च २०२५ असे वाचावे. -व्यवस्थापक**

# अजनाळे, लोटेवाडी व खवासपूर येथील रूपांतरित साठवण तलावासाठी २ कोटी ८७ लाख ३९ हजार रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता

सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला तालुक्यातील अजनाळे येथील रूपांतरित साठवण तलावासाठी १ कोटी ७१ लाख ४७ हजार रुपये तर लोटेवाडी व खवासपूर येथील रूपांतरित साठवण तलावासाठी १ कोटी १५ लाख ९२ हजार रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.मृद व जलसंधारण विभागाने ३१ मार्च रोजी शासन निर्णय प्रसिद्ध करून सांगोला तालुक्यातील अजनाळे (मसाई देवी), लोटेवाडी (म्हस्कादेवी) व खवासपूर येथील रूपांतरित साठवण तलावासाठी २ कोटी ८७ लाख ३९ हजार रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन तसेच प्रगतीपथावरील लघुसिंचन (जलसंधारण) प्रकल्पांच्या कामांसाठी सन २०२४-२५ च्यासुधारित अंदाजपत्रकात मोठ्या प्रमाणावर कपात झाल्यामुळे व तुलनेमध्ये मोठ्या प्रमाणावरील निधी मागणीचे प्रस्ताव राज्याच्या मृद व जलसंधारण विभागाला प्राप्त झाले होते. अन्य योजनांखाली होत असलेली बचत पुनर्विनियोजनाद्वारे सदर योजनेखाली निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यावरील मान्यतेनुसार ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन तसेच प्रगतीपथावरील प्रकल्पांच्या शासनाकडे प्राप्त असलेल्या पात्र व परिपूर्ण कामांची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पाण्याचा शब्द पाळला-चेतनसिंह केदार सावंत

सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असल्याने सांगोला तालुक्यासाठी राजेवाडी तलावातून पाणी सोडण्याची मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीची दखल घेत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पाण्याचा शब्द पाळला असून सांगोल्यातील नागरी सत्कार स्वीकारण्याआधी सांगोल्यासाठी राजेवाडी तलावातून पाण्याचे आवर्तन सुरू केल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवारी पंढरपूर दौऱ्यावर आले होते. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सांगोला तालुक्यातील भीषण पाणी टंचाईची परिस्थिती सांगितली. तालुक्यातील खवासापूर, लक्ष्मीनगर, चिकमहुद, नराळेवाडी, व वाकी गावांना राजेवाडी तलावातून प्रत्येक वर्षी पाच आवर्तने सोडण्यात येतात. परंतु चालू वर्षी उन्हाळी आवर्तनेप्रकरण प्रसिद्ध केले नाही. सदर गावातील शेतकऱ्यांच्या शेतामध्ये ऊस, डाळींब, केळी अशी पिके आहेत. सध्या दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असल्याने राजेवाडी तलावातून उन्हाळी आवर्तने प्रसिद्ध करून वरील गावांना पाणी सोडण्याची मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती.

या मागणीची जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दखल घेतली असून राजेवाडी तलावातून सांगोला तालुक्यासाठी पाण्याचे आवर्तन सुरू करण्यासाठी सकारात्मकता दाखवली आहे. गुरुवार ३ एप्रिल रोजी सांगोल्यात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. सत्कार स्वीकारण्याआधी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी राजेवाडी तलावातून सांगोल्यासाठी पाण्याचे आवर्तन सुरू करण्यात आले आहे. यामुळे सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

# सांगोला विधीज्ञ संघाचे अध्यक्षपदी ॲड. मारुती ढाळे

## उपाध्यक्षपदी ॲड.समाधान दिवसे, सचिवपदी ॲड.अजय तोरणे तर सहसचिव पदी ॲड.सुप्रिया बोत्रे



सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला विधीज्ञ संघाच्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक नुकतीच पार पडली. अत्यंत चुरशीच्या व खेळमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या निवडणुकीत विधीज्ञ संघाचे अध्यक्षपदी ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.मारुती नामदेव ढाळे यांची प्रचंड मताधिक्याने निवड झाली. त्याचप्रमाणे अत्यंत उत्साहात पार पडलेल्या सचिव पदाच्या निवडणुकीत ॲड.अजय संजय तोरणे यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी ॲड. समाधान बजरंग दिवसे तर सहसचिव पदी ॲड.सुप्रिया विकास बोत्रे यांच्या निवडी बिनविरोध करण्यात आल्या. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड.विश्वास गायकवाड यांनी तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड.आनंद बनसोडे यांनी काम पाहिले. नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर झाल्यानंतर नूतन पदाधिकार्यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ सदस्यांचा हस्ते सत्कार करण्यात आला. नूतन अध्यक्ष ॲड.मारुती ढाळे यांनी आपण आपले अध्यक्षपदाच्या कार्यकाळात सर्व ज्येष्ठ सदस्यांसह बार असोशिएनच्या सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांना सोबत घेऊन कामकाज करणार आहोत. आमच्या सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ यशस्वी पार पाडण्यासाठी सर्व विधीज्ञ संघ सदस्यांनी सहकार्य व मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा व्यक्त करून निवडून दिल्याबद्दल सर्व सदस्यांचे आभार मानले.

निर्भिड व सडेतोड
बातम्यांसाठी
नियमित वाचा
साप्ताहिक माणदेश वार्ता

## डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालयात आज कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राईव्हचे आयोजन

सांगोला(प्रतिनिधी):-गुरुवार दिनांक ३ एप्रिल रोजी डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय व एचडीसीएफ बँक यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला येथे कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुसा मुलाणी यांनी दिली आहे. सदर कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राईव्हसाठी महाविद्यालयातील सर्व विभागातील पदवीच्या तृतीय वर्षास असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे. कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राईव्हसाठी येताना सर्व विद्यार्थ्यांनी सकाळी ठीक १०:०० वाजता युनिफॉर्म घालून सोबत आयडेंटिटी कार्ड घेऊन महाविद्यालयात उपस्थित राहावे. सदर कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राईव्हचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन संस्था अध्यक्ष डॉ. अनिकेत (भैय्या) देशमुख यांनी केले. अधिक माहितीसाठी प्लेसमेंट ऑफिसर प्रा. निसार शेख मो-९७६६५२५७८२ यांचेशी संपर्क साधावा.

## कोळे येथील भास्कर काका कुलकर्णी यांचे निधन

कोळा (वार्ताहर):- सांगोला तालुक्यातील कोळे येथील न्यूज पेपर एजंट भास्कर पांडुरंग कुलकर्णी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७० वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी ,पाच मुली, एक मुलगा, तीन भाऊ असा परिवार आहे. पत्रकार जगदीश कुलकर्णी यांचे ते वडील होते .तिसरा दिवस विधी रविवार दिनांक ६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी आठ वाजता कोळे येथे होणार असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली आयोजीत करण्यात आले आहे. यचवेळी व्यासपीठ चालक सौ.जयश्री शीलवंत उपस्थित राहणार आहेत. दि.८ एप्रिल रोजी शिवभक्त दयानंद नागापल्ली यांचे कीर्तन व दि.९ एप्रिल रोजी शिवभक्त हनुमंत कोरे महाराज परांडा यांचे प्रसादाचे किर्तन व भाऊसो गोडसे यांचे भारुड होईल. तरी कोळा व परिसरातील शिवभक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कोळे ग्रामस्थ व वीरशैव समाज कोळे यांनी केले आहे.

## कुक्कुट पालन प्रशिक्षणासाठी प्रवेश घेण्याचे आवाहन

सोलापूर (प्रतिनिधी):-सोलापूर जिल्ह्यातील सर्वपशुपालक शेतकरी, व सुशिक्षितबेरोजगारांना कळविण्यात येते कि,पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषदसोलापूरच्या वतीने सधन कुक्कुट विकास गट नेहरू नगर, सोलापूर येथे ५ दिवसाचे कुक्कुट पालन प्रशिक्षण आयोजित केलेअसून, दि. २१ एप्रिल २०२५ ते २५ एप्रिल २०२५ पर्यंत प्रशिक्षण कालावधी असून, प्रवेश घेऊ इच्छीत असलेल्यांनी दि. ०७ ते १७ एप्रिल २०२५ या कालावधित अर्ज करून प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. सदर प्रशिक्षानार्थ्यांसाठी शैक्षणिक पात्रता किमान ७ वी पास असणे अपेक्षित आहे. तसेच सदर प्रशिक्षण सुशिक्षित बेरोजगारांना सुवर्ण संधी आहे. सदरप्रशिक्षणासाठी प्रवेश फी सर्व प्रवर्गासाठी २००/- रुपये आकारण्यात येईल सोबत शाळा सोडण्याचा दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, फोटो जोडणे आवश्यक आहे. असे आव्हान डॉ. एन. एल. नरळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जिल्हा परिषद सोलापूर यांनी केलेलेआहे. सदर प्रशिक्षणासाठी पशुधनविकास अधिकारी, डॉ. एस. एम.बोधनकर, यांच्याशी संपर्कसाधावा. पत्ता-सधन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर,बी.पी.एड